# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)
"उद्योग सारथी", मरोळ औद्योगिक क्षेत्र, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई-९३

क्र.मऔविम/भूविभाग/म.व्य.(भूमी)/C54894 दिनांक : 7/6/2021

## परिपत्रक

**विषय :- कोव्हिड-१९ च्या पार्श्वभूमीवर वैद्यकीय ऑक्सीजन प्रकल्पासाठी प्राधान्याने भूखंड वाटप करणेबाबत ....**

कोरोना विषाणूच्या महामारीची लाटेमुळे जगभर हाहाकार उडाला आहे. कोरोनाच्या भयाने वर्षभर ब-याच प्रमाणात सारे व्यवहार ठप्प झाले आहेत. औद्योगिक विकास स्थिरावला आहे व त्यांच्या औद्योगिक युनिटवर परिणाम झाले आहेत. जग पहिल्या लाटेतून स्थिरावतो आहे तोच, आता कोरोना विषाणूची दुसरी लाट आलेली असून कोव्हिड रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढतच चालली आहे.

कोव्हिड-१९ च्या दुस-या लाटेत आरोग्य व्यवस्थेचा, पायाभूत सुविधांवर ताण निर्माण झालेला असून आरोग्य व्यवस्था पूर्णपणे कोलमडलेली आहे. महाराष्ट्रात कोरोना रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे रुग्णालयामध्ये रुग्णांना बेड मिळणे दुरापस्त झालेले आहे. प्राणवायूचा पुरवठा कमी पडू लागला आहे. रुग्णांच्या अस्तित्वासाठी आवश्यक असलेला ऑक्सिजन पुरवठा वाढविण्याची गरज रुग्णालयाला भेडसावत आहे. काही ठिकाणी ऑक्सीजन उत्पादन वाहतूक करता येणे शक्य नसल्याने शासनाने सदरहू ठिकाणी तात्पुरते कोव्हिड सेंटर बांधण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच राज्यात कोव्हिड-१९ ची तिसरी लाट जुलै-ऑगस्ट मध्ये येण्याचे अंदाज तज्ञांनी वर्तविला आहे. त्यामुळे राज्यास प्राणवायूच्या बाबतीत स्वयंपूर्ण असणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने प्रत्येक जिल्हयात/गावात वैद्यकीय ऑक्सीजनचा मुबलक असण्याकरीता महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रात वैद्यकिय ऑक्सिजन पुरवठा तसेच त्या सलग्न कंपन्या आणणे आवश्यक असल्याने, ऑक्सीजन पुरवठा करण्याकरीता उद्योजकांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे व त्याकरीता त्यांना विविध सुविधा तसेच भूखंड वाटपात सूट देवून प्राधान्याने भूखंड वाटप करणेकरीता दिनांक २९.०४.२०२१ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या ३८९ व्या बैठकीत सविस्तर चर्चा होवून ठराव क्र. ६२६३ पारीत करण्यात आला. सदरहू पारीत ठरावानुसार वैद्यकिय ऑक्सिजन व त्या सलग्न पुरवठा करणा-या कंपन्यांना खालील नमूद अटी व शर्ती वर प्राधान्याने भूखंड वाटप करण्यात यावे.



Scanned with CamScanner

१. वैद्यकिय ऑक्सिजन उत्पादक तसेच संलग्न उद्योग यांना महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रात प्राधान्य सदराखाली भूखंड वाटप करताना महामंडळाच्या दिनांक १९.१२.२०१२ च्या परिपत्रकातील अ.क्र. ७ नुसार दर परिगणित करण्यात यावा.

२. उपरोक्त परिगणित दरामध्ये, विदर्भ, मराठवाडा, धुळे, नंदुरबार, रत्नागिरी , सिधुदुर्ग , नाशिक विभागामध्ये (नाशिक अहमदनगर व जळगांव मनपा क्षेत्र वगळून) मध्ये उद्योगांना प्राधान्याने भूखंड वाटप करताना अधिमूल्याच्या रक्कमेमध्ये ५० टक्के सूट देण्यात यावी. तसेच याव्यतिरिक्त उर्वरित क्षेत्रामध्ये २५ टक्के सूट देण्यात यावी. सदर सूट देऊन येणा-या रक्कमेच्या २५ टक्के रक्कम देकारपत्र देताना वसूल करण्यात यावी व उर्वरित ७५ टक्के रक्कम वाटपपत्र देताना खालीलप्रमाणे ४ टप्प्यात वसूल करण्यात यावी.

| अ.क्र. | टप्पा | वसुल करावयाची रक्कम |
|---|---|---|
| १ | पहिला | २० टक्के |
| २ | दुसरा | २० टक्के |
| ३ | तिसरा | २० टक्के |
| ४ | चौथा | १५ टक्के |

३. उपरोक्त तक्त्यात नमूद रक्कम २ वर्षात ४ टप्प्यात वसूल करावयाची आहे व सदरहू रक्कम वसूल करताना त्या कालावधीत व्याज आकारण्यात येवू नये.

४. अशा उद्योगांना प्राधान्याने भूखंड वाटप करताना गुंतवणूकीची किंवा रोजगार निर्मीती अट राहणार नाही.

५. ऑक्सिजन निर्मिती प्रकल्पासाठी १५ टन प्रति दिन उत्पादनाकरीता जास्तीत जास्त १ एकर क्षेत्राच्या प्रमाणात क्षेत्र परिगणीत करुन भूखंड वाटप करण्यात यावा. अर्जदाराची त्यापेक्षा जास्तीच्या क्षेत्राची मागणी असल्यास तांत्रिक सल्लागार यांचे अभिप्राय घेवून, भूखंड वाटप करताना अनुज्ञेय क्षेत्रापेक्षा जास्तीच्या क्षेत्राकरीता अधिमूल्याच्या रक्कमेमध्ये कोणतीही सूट न देता महामंडळाच्या दिनांक १९.१२.२०१२ च्या परिपत्रकातील अ.क्र. ७ नुसार दर आकारण्यात यावा. प्रकरणी २५ टक्के रक्कम देकारपत्रा देताना वसूल करण्यात यावी व उर्वरित ७५ टक्के रक्कम अ. क्र. ४ मध्ये नमूद केल्यानुसार ४ टप्प्यात वसूल करण्यात यावी.

६. सदरहू उद्योगास १० वर्षे त्याच्या उत्पादनात बदल करता येणार नाही. उत्पादन बंद केल्यास महामंडळास भूखंड परत करावा लागेल. भूखंड हस्तांतर करता येणार नाही.

Scanned with CamScanner

७. उद्योजकाने देकारपत्राची रक्कम भरल्यानंतर प्रादेशिक कार्यालयाने त्वरीत विनाविलंब कंपनीस भूखंडाचा ताबा द्यावा. महामंडळाच्या नियमानुसार इतर औपचारिकता(formalities) तदनंतर करण्यात याव्यात. कोणत्याही ओपचारिकतेसाठी वैद्यकिय ऑक्सीजनचे उत्पादन थांबविण्यात येवू नये.

८. सदरहू धोरण दिनांक ३१.१२.२०२१ पर्यन्त लागू राहिल.

९. उपरोक्त अटी व शर्ती व्यतिरिक्त परिस्थितीनुरुप इतर अटी व शर्ती निर्धारित करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहेत.

सदरहू धोरण शासन निर्णय क्र. साप्रोयो २०२१/प्र.क्र. ८२/उद्योग-८ दिनांक २१.०५.२०२१ पासून लागू राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

(अभिषेक कृष्णा)
सह मुख्य कार्यकारी अधिकारी(प्रशासन)
मऔविम, मुंबई.

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
५. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
६. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे /औरंगाबाद/नागपूर.
७. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.
८. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
९. व्यवस्थापक (भूसंपादन-१/२), मऔविम, मुंबई.
१०. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
११. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम.
१२. म.औ.वि. महामंडळाचे सर्व संचालक.
१३. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
१४. सर्व औद्योगिक संघटना.
१५. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यू.टी.सी.), कफ परेड, मुंबई



Scanned with CamScanner